एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक शेतकरी आत्महत्यांप्रकरणी द्यावयाची शासकीय मदत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : एससीवाय-२०१५/प्र.क्र.१५/म-७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :- १) शा.नि., म.व व. विभाग, क्रमांक : एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७ दि.१९.१२.२००५
२) शा.नि., म.व व. विभाग, क्रमांक : एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७ दि.२३.०१.२००६

प्रस्तावना:-

नापिकी, राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करू शकल्याने होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज फेडीचा तगादा या तीन कारणांमुळे झालेल्या शेतकरी आत्महत्या प्रकरणी एक सहानुभूतीची बाब म्हणून मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांस रू.१.०० लक्ष इतकी रक्कम तातडीची मदत म्हणून देण्यात येते. तथापि, एकाच कुटुंबातील एका पेक्षा अधिक सदस्यांनी आत्महत्या केल्यास अशा प्रकरणी तातडीची मदत द्यावी, याबाबत उपरोल्लिखित शासन निर्णयात स्पष्ट उल्लेख नसल्याने याबाबत शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आले होते.

शासन परिपत्रक:-

एका आर्थिक वर्षात एकत्रित कुटुंबातील म्हणजेच ज्यांच्या जमिनीची खातेफोड झालेली नाही, अशा कुटुंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तींच्या पात्र आत्महत्या प्रकरणी सदर कुटुंबातील कमाल ०२ (दोन) व्यक्तींच्या प्रकरणी शासनाची मदत रू.१.०० लक्ष या प्रमाणे एकूण रू.२.०० लक्ष इतकी अनुज्ञेय राहील.

२. शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०३०११५३२२०१९१९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2018.03.01 15:32:43 +05'30'

(सुभाष उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व विभागीय आयुक्त.
५. सर्व जिल्हाधिकारी.